पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या
अधिनस्त कार्यालयाकरीता पदे निर्माण करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग.

शासन निर्णय क्र. अेपीओ/१२१४/प्र.क्र.३१/पोल—३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ जून, २००७.

वाचा १) पोलीस महासंचालक यांचे पत्र क्रमांक.पोमसं—२६ ब/पदनिर्मिती/११०२१/२००—०७/१०६/०६, दि.२.११.२००६
२) पोलीस महासंचालक यांचे पत्र क्रमांक.पोमसं—२६ब/पदनिर्मिती/ ११०२१/१०६/,६, दि. १५ मार्च, २००७
३) विशेष पोलीस महानिरीक्षक (नि.व स.) यांचे पत्र क्रमांक. पोमसं/२६/ब /पदनिर्मिती/११०२१/१०६/०६, दिनांक १८.५.२००७.

प्रस्तावना —

महाराष्ट्र राज्यात उपलब्ध असलेले पोलीस दल, पोलीस दलाकडून पार पाडली जाणारी कामे व ती पार पाडताना येणा—या अडचणी याबाबत सविस्तर सादरीकरण दिनांक २.२.२००५ रोजी झालेल मंत्रीमंडळाच्या बैठकीत करण्यात आले होते. त्यावेळी पोलीस दलातील पदांचा अभ्यास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या विविध समित्यांनी प्रस्तावित केलेली वाढीव बलाची शिफारस विचारात घेऊन पोलीस दलाकरिता ५५,००० इतकी पदे आवश्यक असल्याचे प्रतिपादन करण्यात आले आहे. तथापि, त्यावेळी सन १९६० च्या मानकानुसार आवश्यक असलेली किमान ११०२१ पदे निर्माण करण्यास मंत्रीमंडळाने तत्वत मान्यता दिली होती. ही देण्यात आलेली मान्यता विचारता घेऊन गृह विभाग, शासन निर्णय— क्रमांक अेपीओ ३६०५/प्र.क्र.३/पोल—३, दिनांक १७.२.२००६ अन्वये पोलीस महासंचालक यांच्या अधिनस्त असलेल्या आस्थापनेकरीता विविध संवर्गातील ८६९२ पदे निर्माण करण्यास मान्यता दिली होती. तद्नंतर महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या, शहराच्या लोकसंख्येत झालेली वाढ, त्यामुळे निर्माण झालेल्या वाहतुक समस्या, राज्यात झालेली औदयोगिक वाढ, आधुनिकीकरणांमुळे गुन्हयांच्या प्रमाणात झालेली वाढ, आणि त्यांचे बदललेले स्वरूप, नक्षलग्रस्त भागात तणाव आणि रेल्वेत झालेले बॉम्बस्फोट इत्यादी बाबी विचारात घेऊन पोलीस बलाकरिता ११०२१ वाढीव पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालक यांनी उपरोक्त नमूद केलेल्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय —

वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने मंत्रीमंडळाच्या दिनांक १६ मे २००७ रोजी झालेल्या बैठकीत सर्वागीण विचार करून विविध संवर्गातील ११०२१ पदे निर्माण करण्यास मंत्रीमंडळाने दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबतच्या विवरणपत्र 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे पोलीस महासंचालक यांच्या अधिनस्त असलेल्या विविध आस्थापनेकरिता विविध संवर्गातील ९७२१ पदे ( नऊ हजार सातशे एकवीस ) निर्माण करून ती भरण्यास शासन या द्वारे खालील अटीच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

अ) विवरणपत्र " अ" मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदांचा आस्थापना/ घटकनिहाय तपशील सोबतच्या विवरणपत्र 'ब' मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे राहील.

ब ) विवरणपत्र 'ब' मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदाच्या बाबतीत राज्याच्या सीमावर्ती जिल्हयाच्या गरजा आणि इतर आवश्यक बाबी विचारात घेऊन घटकनिहाय पदे वाटपात बदल करण्याचे अधिकार गृह विभागास राहतील.

..२..

क) विवरणपत्र 'अ' मध्ये दर्शविण्यात आलेली पदे त्यासाठी केलेल्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार भरण्यात यावी. ज्या पदाच्या बाबतीत सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले नाहीत. त्या पदांच्या बाबतीत सेवाप्रवेश नियम पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी तात्काळ तयार करून शासनाकडून मान्य करून घ्यावेत. सेवाप्रवेश नियम मान्य झाल्यानंतर सदरहू पदे सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनूस भरण्याची कार्यवाही करावी.

२. वरीलप्रमाणे निर्माण केलेल्या पदाकरीता विवरणपत्र "ब" मध्ये संबंधित आस्थापनेखाली दर्शविलेल्या बाबीकरीता रक्कम खर्च करण्यास शासन याद्वारे तत्वत मान्यता देत आहे. मात्र वाहनावरील खर्च हा आधुनिकीकरण योजने अंतर्गत उपलब्ध होणा—या तरतूदीतून व इतर बाबी करीता सन २००७—०८ या वर्षाकरीता "२०५५—पोलीस व खालील संबंधित उपशिर्षाखाली केलेल्या व पावसाळी अधिवेशनात पूरवणी मागणी सादर करून केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. सदरहू खर्चासाठी रक्कम उपलब्ध झाल्यानंतरच त्याबाबतीत विहीत पध्दतीचा अवलंब करून खर्च करण्यात यावा व त्याखाली दर्शविलेल्या प्रधानशिर्ष / उपशीर्षाखाली दर्शविण्यात यावा.

३. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक.सीआर१३३/व्यय—३, दिनांक.४.५.२००७ अन्वये मान्यता घेऊन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( अ. न. नाईकनवरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.राज्यमंत्री (गृह) याचे स्वीय सहाय्यक.
५) प्रधान महालेखाकार, (लेखा परिक्षा)—१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) महालेखापाल, महाराष्ट्र—१/२ (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर.
७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, सोलापूर, अमरावती, नवीमुंबई, ठाणे.
९) सर्व पोलीस अधिक्षक, जिल्हा पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य.
१०)सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
११)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२)वित्त विभाग ( व्यय—७/विनियम) अर्थोपाय शाखा, मंत्रालय, मुंबई.
१३)गृह विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव /कार्यासन अधिकारी.
१४)गृह विभागाच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.
१५)निवड नस्ती, पोल—३.

## वाहतुक (महामार्ग सुरक्षा पथक ३ टॅप)

| अ. क्र | पदांचा तपशील | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सहाय्यक पोलीस निरीक्षक | पोलीस हवालदार | पोलीस नाईक | चालक पोलीस नाईक | |
| १ | पोलीस अधिक्षक, बीड (मांजरसुंभा) | ३ | ३ | २८ | ३ | ३७ |
| २ | पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग (नळदुर्ग) | ३ | ३ | २७ | ३ | ३६ |
| ३ | पोलीस अधिक्षक, लातूर (लातूर) | ३ | ३ | २७ | ३ | ३६ |
| | एकूण | ९ | ९ | ८२ | ९ | १०९ |

मंजुर करण्यात आलेली रक्कम :— आवर्ती रू.९३,९०,६३३/—, अनावर्ती रू.१७,६८,०००/—
अनावर्ती खर्चाचा तपशील :— कार्यालयीन खर्च १,१२,०००/—, वाहने १४,४०,०००/—, हत्यारे व दारूगोळा २,१६,०००/—
उपशिर्ष :— १०९ जिल्हा पोलीस — (००) (०१) जिल्हा पोलीस दल—दत्तमत—(२०५५ ०१६८)